| MHK0110006772026 | **नियमित दिवाणी दावा नं. ६३/२०२६**<br>**निशाणी क्रमांक २० वरील आदेश**<br>**राहूल अजित वडर वगैरे**<br>**वि.**<br>**अजित शामराव वडर वगैरे** |
|---|---|

वादीने प्रस्तुतचा अर्ज दावा मिळकतीमध्ये जैसे थे परिस्थिती ठेवणेकरिता दाखल केला आहे.

२. वादी यांनी प्रतिवादी यांचे विरूध्द कायम मनाईकरिता दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दावा मिळकत ही. दावा मिळकत ही वादी यांची वडीलार्जित मिळकत असून त्याचा ग्रामपंचायत चालता नं.९१४ असा नमुद होता. त्यानंतर सदर मिळकतीचे विभाजन होउन ग्रामपंचायत चालता नं. २०६० असा देणेत आला. असे असताना प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी संगनमताने दावा मिळकतीचा तारणगहाण दस्त केला आहे. परंतु, त्यामध्ये दावा मिळकतीचा नंबर २०६०/२ असा नमूद केल्याचे निदर्शनास आले आहे.

३. वादी अगर त्यांचे पूर्वहक्कदार यांना ग्रामपंचायत मिळकत नं. २०६० यांना कोणतीही नोटीस आलेली नाही. अशा परिस्थीतीमध्ये प्रतिवादी नं. ३ हे अनाधिकाराने दावा मिळकत जप्त करण्याच्या प्रयत्नात आहेत. सदरची मिळकत जप्त झालेस वादीचे नुकसान होणार आहे. अशा परिस्थीतीत दावा मिळकत नं. २०६० बाबत यातील प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी संगनमताने कोणतीही कार्यवाही करू नये अगर दावा मिळकत विक्री करू नये यासाठी जैसे थे परिस्थती ठेवणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

४. वारंवार संधी देउन देखील प्रतिवादी क्र. १ व २ यांनी हजर होउन देखील त्यांचे म्हणणे सदर अर्जावर दाखल केलेले नाही त्यामुळे त्यांच्याविरूध्द म्हणणे नाही असा आदेश पारित केला आहे. तसेच प्रतिवादी क्र. ३ यांना समन्स लागू होउन देखील या कामी हजर झाले नाहीत. सबब, त्यांचेविरूध्द एकतर्फा आदेश पारित केला आहे.

**५.** वादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

**६.** वादी यांनी कायम मनाईकरीता प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या विरुद्ध दाखल केला आहे. वादी यांनी अर्जात कथ्झन केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १ यांनी करून दिलेल्या तारण गहाण दस्तामध्ये मिळकतीचा क्र. २०६०/२ असा नमूद केलेला आहे. परंतू, वादी कथन करत असलेला कथीत तारणगहाण दस्त या कामी अभिलेखावर दिसून येत नाही. त्यामुळे, सदर तारण गहाण दस्तामध्ये मिळकतीचा क्रमांक वादी कथन करतात त्याप्रमाणे २०६०/२ असा नमूद आहे किंवा कसे याची पडताळणी करता येत नाही. तसेच, सदर दस्त अभिलेखावर नसल्यामुळे प्रतिवादी यांचे विरूध्द जैसे थे परिस्थीती ठेवणेचा आदेश पारित करणे न्यायोचित होणार नाही. वाद कथनाचे तसेच तुर्तातुर्त अर्जातील कथने विचारात घेता प्रस्तुत प्रकरणात आजरोजी जैसे थे परिस्थिती ठेवण्याची आवश्यकता आहे असे दिसून येत नाही. कारणे मी खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१) अर्ज (निशाणी क्र. २०) नामंजूर करण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2026.07.16 17:28:00 +0530

**पेठ–वडगांव.**
**दिनांक १६/०७/२०२६**

**( जे.एन. भस्मे )**
**३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**पेठ–वडगांव.**